# ‘युवा अभियंत्यांनी जगाला काहीतरी चांगले द्यावे’

सकाळ वृत्तसेवा

बारामती, ता. १७ : ‘युवा अभियंत्यांनी जगाला चांगले काहीतरी देण्याचा ध्यास सदैव मनामध्ये ठेवावा, सर विश्वेश्वरैय्या यांनी जे काम करून दाखविले आहे, त्याचा आदर्श ठेवावा’, असे प्रतिपादन विद्या प्रतिष्ठानच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. देवसरकर यांनी केले.

दर वर्षी १५ सप्टेंबर हा भारतरत्न डॉ. सर विश्वेश्वरैय्या यांचा जन्मदिन ‘इंजिनिअर्स डे’ म्हणून साजरा केला जातो. येथील बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या बारामती शाखेच्या वतीने व विद्या प्रतिष्ठान अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सहकार्याने यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याच्या समारोपप्रसंगी डॉ. देवसरकर बोलत होते.

यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर व मॉडेल प्रेझेंटेशन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमाचे उद्‍घाटन डॉ. देवसरकर यांच्या हस्ते व बिल्डर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रफुल्ल तावरे, सचिव सुरेंद्र भोईटे, उपाध्यक्ष विजय सोळसकर, खजिनदार आशपाक सय्यद, सहसचिव दीपक काटे आदी उपस्थित होते.



बारामती : विद्यार्थ्यांनी केलेले प्रयोग पाहताना प्राचार्य डॉ. एस. बी. देवसरकर, प्रफुल्ल तावरे व इतर.